# अण्णांचा ब्लॉग बंद करण्याचा निर्णय

नवी दिल्ली : ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी आपला ब्लॉग बंद करण्याचा निर्णय जाहिर केलाय. वर्डप्रेस आणि ब्लॉगस्पॉट या ब्लॉगसाईटवर असलेला अण्णा हजारे सेज हा ब्लॉग बंद करण्याचा निर्णय अण्णांनी आज राजधानी नवी दिल्लीत घेतलेल्या पत्रकार परिषदेत जाहिर केला. तसंच या ब्लॉगवर त्यांचे माजी अधिकृत ब्लॉगर राजू परूळेकर यांनी टाकलेलं पत्र आपली सही नसल्यामुळे अधिकृत नसल्याचा दावाही त्यांनी यावेळी केला.

जेष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या ब्लॉगरनं केलेल्या ब्लॉगच्या गैरवापरामुळे ब्लॉग बंदच करणार असल्याचे अण्णांनी स्पष्ट केलं. ब्लॉगवरचे पत्र म्हणजे आपल्या बदनामीचा कट असल्याचा संशयही अण्णांनी व्यक्त केला. माझी प्रतिमा मलिन करण्यासाठी कोट्यवधी रूपये खर्च करण्यात येत आहे. ब्लॉगवरचं हे पत्र हा त्याचाच भाग असावा असं अण्णांनी म्हटलं आहे.

पत्रावर जर माझी सही असेल तरच ते खरं समजावे असंही अण्णांनी स्पष्ट केलं. ज्या ब्लॉगवरुन अण्णा जनतेला संदेश देतात, आंदोलनाला दिशा देतात त्याच ब्लॉगचा ब्लॉगरने स्वत:चा बचाव करण्यासाठी वापर केल्याने टीम अण्णामध्ये खळबळ माजली. अण्णांच्या ब्लॉगवरुन ब्लॉगरने टीम अण्णांवरच टीका केली होती. ब्लॉगरनी, अण्णांचे हस्तलिखीत पत्रच ब्लॉगवर प्रसिद्ध केलं.

टीम अण्णांची पुर्नरचना करण्यासंदर्भात अण्णा हजारे यांनीच लिहून दिल्याचा दावा ब्लॉगरनी केला. अण्णांनी काल केलेल्या टीकेमुळे व्यथित झालो असल्याचंही ब्लॉगरनी म्हटलं आहे. या सगळ्या वादावर स्वत: अण्णांनी स्पष्टीकरण देत आपण ब्लॉगच बंद करत असल्याचे स्पष्ट केलं आहे.

## कोअर कमिटीची फेररचना करण्याचा विचार होता, पण......

दरम्यान, अण्णा हजारेंनी यांनीच आपल्याला कोअर कमिटीची पुर्नरचना करण्यासंदर्भात लेखी लिहून दिले होते तेच आपण ब्लॉग मध्ये लिहिल्याचं राजू परुळेकर यांनी सांगितलं आहे. २३ ऑक्टोबरला लिहलेल्या या पत्रामध्ये अरविंद केजरीवाल, किरण बेदी आणि प्रशांत भूषण यांच्या व्यतिरिक्त टीम अण्णाच्या कोअर कमिटीची पुर्नरचना करण्याचा आपला विचार असल्याचे अण्णांनी सांगितल्याचं परुळेकर यांनी ब्लॉग मध्ये लिहिलं आहे. हे पत्र लिहत असतांना अण्णांचे स्वीय सहाय्यक सुरेश पठारे हेही उपस्थित होते. सुरेश पठारे यांनी अण्णांना थांबवण्याचा प्रयत्न केला होता. असा दावाही परुळेकर यांनी केला.